वर्ष १० वे विषेश अंक R.N.I.N.MAHMAR/2013/51443-L/175/RNP/Beed/2022-24 संपादक-अबुबकर खमर पाशा मो.९५४५३८१२२० वार-रविवार दि. १२ जानेवारी २०२५ पाने ४ किंमत ३

## महाकाल मंदिर परिसराच्या विस्तार आणि सुशोभीकरणाच्या मार्गात अडथळा ठरणारी

# बेगमबाग कॉलनीतील २३० घरे केली जमिनदोस्त



Email:- dailydivyawarta@Gmail.com Email:-editordivyawarta@gmail.com

दिव्य वार्ता

## मस्जिद केली जमीनदोस्त, नागरीकांत मोठा संताप, पोलिसांचा मोठा बंदोबस्त

## उज्जैन महाकाल मंदिराजवळील तकिया मशिदीवर प्रशासनानी चालविला बुलडोजर

### न्यायालयाचा निर्णयानंतर कारवाई

महाकाल मंदिर क्षेत्राचे विस्तारीकरण आणि सौंदर्यीकरणास बेगमबाग आणि निझामुद्दीन कॉलनीतील घरे अडथळे ठरत होती. या ठिकाणी अतिक्रमण काढण्याचे प्रकरण अनेक वर्ष न्यायालयात सुरु होते. उच्च न्यायालयाने त्यास मंजुरी दिल्यावर शनिवारी अतिक्रमण काढण्यात आले. अतिक्रमण काढण्याच्या कारवाईच्या प्रसंगी मोठ्या संख्येने पोलीस दल घटनास्थळी ठेवण्यात आले होते.

### सव्वा दोन हेक्टर परिसर रिकामा

शनिवारी अतिक्रमण काढण्याची कारवाई होणार असल्यामुळे शुक्रवारी मोठ्या संख्येने पोलीस दल घटनास्थळी तैनात करण्यात आले होते. अतिरिक्त पोलीस अधीक्षक नितेश भार्गव आणि एसडीएम लक्ष्मी नारायण गर्ग यांनी घरे रिकामी करण्याचे अपील केले होते. दुसरीकडे अनेक लोकांनी स्वइच्छेने घरी रिकामी करुन दिली. महाकाल मंदिर विस्तार योजनेतंर्गत हे काम करण्यात आले. सुमारे सव्वा दोन हेक्टर परिसर मोकळा करण्यात आला.

### मुस्लीम धर्मगुरुंसोबत अनेक फेऱ्यांमध्ये चर्चा

अतिरिक्त पोलीस अधीक्षक नितेश भार्गव यांनी सांगितले की, मशीद हटवण्यासाठी धर्मगुरुंसोबत चर्चा झाली. त्यानंतर त्यांनी मशीदचे सामान काढण्यासाठी वेग मागितला. प्रशासनाने त्यांना तो वेळ दिला. धर्मगुरुंच्या संमतीनंतर मशीद पाडण्याची कारवाई झाली.

उज्जैन, (दिव्य न्युज):- उज्जैनमधील महाकाल मंदिराजवळ बांधलेल्या बेगमबाग कॉलनीतील २३० हून अधिक घरे प्रशासनाकडून पाडण्यात आली आहेत. महाकाल मंदिराच्या बाजुला असणारी तकिया मशीददेखील प्रशासन आणि पोलिसांच्या देखरेखीखाली जमीनदोस्त करण्यात आली. प्रशासनाकडून ही कारवाई सुरू असताना स्थानिक लोकांनी विरोध देखील दर्शवला. दरम्यान, काही लोकांनी दगडफेक करण्याचा प्रयत्न केला. मात्र पोलिसांनी तातडीने परिस्थिती नियंत्रणात आणली आणि ही कारवाई सुरूच ठेवली. तथापि, प्रशासनाने याला दुजोरा दिला नाही. पण पोलिसांनी सांगितले की, जर अशी घटना घडली असेल ▶▶ पान २ वर

# सर सय्यद अहेमद खान शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात



बीड, (दिव्य न्युज):- आज सर सय्यद अहेमद खान प्राथमिक व पिपल्स माध्यमिक शाळेत स्नेहसंमेलन उत्साहात साजरे झाले या वेळी विद्यार्थ्यांनी विविध कला सादर केल्या तसेच यावर्षीचा पॅरेन्ट्स ऑफ द इयर हा पुरस्कार सय्यद असीम सय्यद कलिम उर्फ (मामु) यांना देण्यात आला.या वेळी बीड चे आमदार संदीप भैय्या क्षीरसागर माजी आमदार सय्यद सलीम ,माजी आमदार सुनील धांडे व शाळेचे सचिव वकील सर संपादक अबूबकर चाऊस शेख शफीक भाऊ ,संपादक खमर उल इमान , शेख निजाम, मान्यवर उपस्थित होते.सर्वांनी सय्यद असीम मामु यांचे बेस्ट पॅरेन्ट्स ऑफ द इयर हा पुरस्कार देऊन अभिनंदन केले.

## आरिफ खानने इस्लाम धर्माचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी अभिनय क्षेत्र सोडले

### एकेकाळी अजय देवगणला अभिनयात दिलेली काटे कि टक्कर



मुंबई , (दिव्य न्युज):- बॉलिवूडमध्ये असे काही कलाकार आहेत ज्यांनी धर्माच्या कारणावरून बॉलीवूडला रामराम केला आहे. झायरा वसीम, सना खान यांच्याबरोबर आणखी काही कलाकारांनी धार्मिक कारणाने बॉलिवूड सोडलं. पण यात आणखी बॉलिवूडचा आघाडीचा व्हिलन आहे जो कलाविश्वाला बाजुला करत धार्मिक क्षेत्र निवडले.हा अभिनेता म्हणजे आरिफ खान. आरिफने बॉलिवूडमधील अनेक बॉलिवूड सिनेमांमध्ये निगेटिव्ह भूमिका साकारल्या आहेत. त्याच्या भूमिकेमुळे एकेकाळी त्याने अनेक सिनेमात खलनायक साकारला होता.

१९९१ मध्ये अजय देवगणने फुल और काटे या सिनेमातून बॉलिवूडमध्ये पदार्पण केलं. या सिनेमात त्याच्याबरोबर मधुची मुख्य भूमिका ▶▶ पान २ वर

# परळीत आणखी एका सरपंचाचा मृत्यू, सर्वत्र एकच खळबळ

बीड , (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्यातील केज तालुक्यामधील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबररोजी अपहरण करून हत्या करण्यात आली. या प्रकरणामुळे महाराष्ट्रातील राजकारण ढवळून निघाले आहे. देशमुख यांच्या हत्येनंतर बीडमधील इतरही अनेक गुन्हे या काळात समोर आले. अशात परळीत एक धक्कादायक घटना घडली आहे. यामुळे सर्वत्र एकच खळबळ उडाली आहे.

परळीमध्ये औष्णिक केंद्राची राख वाहतूक करणाऱ्या टिप्परने सरपंचाला उडवले यात सौंदाण्याचे सरपंच अभिमन्यू क्षीरसागर यांचा मृत्यू झालाय. या भीषण अपघातात त्यांच्या दुचाकीचा चेंदामेंदा झालाय. परळी तालुक्यातील मिरवड




फाट्यावर शनिवारी रात्री हा अपघात झाला.

सौंदाणा गावचे सरपंच अभिमन्यू क्षीरसागर यांच्या दुचाकीला राखेची वाहतूक करणाऱ्या टिप्परने उडवले. यामध्ये त्यांचा जागीच मृत्यू झालाय. संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर परळीत हा भीषण अपघात घडला. आता या अपघाताने पुन्हा खळबळ उडाली आहे.

अपघातानंतर टिप्पर चालक फरार झाला आहे. हा अपघात आहे की घातपात याचा आता पोलीस तपास ▶▶ पान २ वर

# बाप एक नंबरी, बेटा दस नंबरी

## रिव्हॉल्वर, सोनं, आणि कार, वाल्मिक कराडच्या पोराचं नवी प्रकरण समोर

बीड , (दिव्य न्युज):- बीडचे मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी आणि अवादा कंपनी खंडणी प्रकरणी वाल्मिक कराडभोवती दिवसेंदिवस फास आवळत चालला आहे. वाल्मिक कराडचे बीडमधील एक एक कारनामे समोर येत आहे. अशातच बाप एक नंबर आणि बेटा दस नंबरी असा प्रकार आता वाल्मिक कराडसोबत उघड झाला आहे. कराडच्या पोरगा सुशील कराडने घरात घुसून रिव्हॉल्वरचा धाक दाखवून



दोन बल्कर ट्रक, दोन कार, परळीतील प्लॉट आणि सोने बेकायदेशीरपणे ताब्यात घेतल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणी सुशीलवर गुन्हा दाखल झाला असून सुनावणी सुरू आहे.

वाल्मिक कराडनंतर आता त्याचा मुलगा सुशील कराड देखील अडचणीत येण्याची ▶▶ पान २ वर

## व्हिडिओ कॉलवर ६ जण पाहात होते लाईव्ह मर्डर

### सरपंच खून प्रकरणात सर्वात मोठी अपडेट!

बीड, (दिव्य न्युज):- बीड जिल्ह्याच्या केज तालुक्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची ९ डिसेंबर रोजी अपहरण करून निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या घटनेला आता एक महिन्याचा कालावधी लोटला आहे. मात्र ▶▶ पान २ वर



# मंत्री धनंजय मुंडेचे ड्रग्ज तस्करांशी कनेक्शन,तेच आहेत मुख्य 'आका'

### सुरेश धस यांचा आणखी एक खळबळजनक दावा



धाराशिव, (दिव्य न्युज):- पाकिस्तानातून भारतात ड्रग्जची तस्करी होत असल्याचे एका कारवाईतून उघड झाले. गुजरातमध्ये ८९० कोटींचे ड्रग्ज पकडण्यात आले होते. त्यातील कृष्णा सानप व दत्ता आंधळे हे दोन आरोपी वर्षभरापासून जेलमध्ये आहेत. त्यांचे मंत्री धनंजय मुंडे यांच्यासोबत फोटो आहेत. मुंडे हेच मेन आका असल्याचा दावा आमदार सुरेश धस यांनी धाराशिवच्या आक्रोश मोर्चातून केला.

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख व परभणीतील सोमनाथ सूर्यवंशी यांना न्याय मिळवून देण्याच्या मागणीसाठी शनिवारी हा मोर्चा निघाला. आमदार धस म्हणाले, तुमच्या खंडणीआड आल्याने हत्या केली. तत्पूर्वी, खंडणीची तक्रार घेऊ नका म्हणून पोलिसांना आकाने फोन केले. ▶▶ पान २ वर

## लाडकी बहिण पंकजांकडून भाऊ धनंजय मुंडेंची पाठराखण



# राजीनाम्यावरून रणकंदन



### मंत्री धनंजय मुंडेंच्या जागी कायंदेंना सधी द्यावी: धस

उस्मानाबाद : मंत्री धनंजय मुंडे यांचे ड्रग्ज प्रकरणातील आरोपींसोबत फोटो आहेत. त्यामुळे अजित पवारांनी धनंजय मुंडेंना मंत्रिपदावरून दूर करून त्यांच्या जागी मनोज कायंदे यांना संधी द्यावी, अशी मागणी भाजप आमदार सुरेश धस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याकडे केली. तुमच्या पक्षातील अनेक आमदार निवडून आले आहेत. त्यातील कोणालाही संधी द्या, मात्र त्यांना मंत्रिमंडळातून बाजूला करा. त्या लोकांनी भरदिवसा हत्या केली. पुढील काळात ते सकाळीदेखील हत्या करतील, असा इशारादेखील धस यांनी दिला आहे.**दोघांनाही बिनभाड्याच्या खोलीत टाका : ॲट्रॉसिटी दाखल**करू नका म्हणून आकाने पोलिसांना फोन केला होता. त्यानंतर आका त्याच्या आकाशी बोलला असेल तर आकाही या प्रकरणात आरोपी होतील, असेही त्यांनी सांगितले.

**वरच्या आकाची सातपुडा बंगल्यावर बैठक**

या प्रकरणातील वरच्या आकाने १९ ऑक्टोबर रोजी स्वतःच्या सातपुडा बंगल्यावर बैठक घेतली. त्यामुळे तो यामध्ये आरोपी का नाही? असा सवाल धस यांनी उपस्थित केला. संतोष देशमुख यांची हत्या केवळ दीड कोटी रुपयांसाठी केली गेल्याचेही त्यांनी सांगितले.

### धस बीड जिल्ह्याची बदनामी करत आहेत:पंकजा मुंडे

औरंगाबाद : पुण्यामध्ये तरुणीची हत्या झाली. मुळशी पॅटर्नसारख्या घटना घडत आहेत. नागपूरमध्ये महिलेला नाक घासून माफी मागायला लावली. गुन्हेगारीच्या घटना विविध जिल्ह्यांमध्ये घडत आहेत. अशा घटना थांबवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. या घटनांवर राजकारण होता कामा नये. बीड जिल्ह्यातील घटनांमध्ये दोषींवर कडक कारवाईचे गृहमंत्र्यांनी निर्देश दिले आहेत. परळी व बीडच्या प्रकरणामध्ये ज्या प्रकारे आमदार सुरेश धस यांनी राजकारण केले आहे त्यामुळे जिल्हा बदनाम झाला आहे, असा आरोप मंत्री पंकजा मुंडे यांनी केला.बीडच्या पालकमंत्रिपदाबद्दल मुंडे यांना विचारले असता त्या म्हणाल्या, धनंजय मुंडे यांना निवडून आणण्यासाठी आम्ही प्रयत्न केले, तर त्यांनी माझ्यासाठी त्यांनीही प्रयत्न केले. त्यामुळे पालकमंत्रिपदासाठी आमच्यामध्ये कसलीही रस्सीखेच नसल्याचे पंकजा मुंडे यांनी या वेळी सांगितले.

**मुंडेंच्या राजीनाम्याबाबत पवार बोलले**

धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावर अजित पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते जर म्हणत असतील की शोध लागत नाही तोपर्यंत कारवाई करणार नाही. त्यावर मी काउंटर करणार नाही. शोध लागेपर्यंत कारवाई करणार नसतील तर त्यावर मी काय बोलणार? असे पंकजा मुंडे म्हणाल्या.



विष्णू चाटे | सुदर्शन घुले | सुधीर सांगळे | जयराम चाटे | महेश केदार | प्रतीक घुले | सिद्धार्थ सोनवणे | कृष्णा आंधळे

# आका सोडून सर्वांना मोक्का

## वाल्मिक कराडला वाचवण्याचा प्रयत्न, फक्त खंडणीचा गुन्हा

### संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आठ आरोपींवर मकोका

**बीड, (दिव्य न्युज):– सरपंच देशमुख यांच्या हत्येला गुरुवारी ९ रोजी एकमहिना पूर्ण होत आहे. गुन्ह्याच्या तपासासाठीमहिनाभरात तीन तपास यंत्रणा बदलल्या. न्यायालयीनचौकशीची घोषणा झाली असली तरी अद्याप याबाबतचेआदेश निघाले नाहीत. सुरुवातीला बीड पोलिसांनी याप्रकरणात तपास करत ४ आरोपींना अटक केली. त्यानंतरगुन्हा तपासासाठी सीआयडीकडे गेला. मात्रसीआयडीला एकाही आरोपीस अटक करता आलीनाही. नंतर तपास एसआयटीकडे गेला, मात्रएसआयटीलाही यश आले नाही. बीड पोलिसांच्यास्थानिक गुन्हे शाखेनेच ५ जानेवारीला दोन मुख्यआरोपींना पकडले. या प्रकरणात पोलिस अधीक्षकअविनाश बारगळ यांची बदली झाली. पोलिस निरीक्षकमहाजन यांना सक्तीच्या रजेवर पाठवले तर उपनिरीक्षक राजू पाटील यांना निलंबित केले आहे.**

### खुनात सहभागींची संख्या आठ, सोनवणे नवा आरोपी

खुनाच्या घटनेनंतर पहिल्या दोनदिवसांत जयराम चाटे, महेश केदारव प्रतीक घुले यांना अटक झाली. १८डिसेंबरला विष्णू चाटेही पोलिसांनागवसला. त्यानंतर खुनाच्या २६दिवसांनी मुख्य आरोपी सुदर्शन घुले,सुधीर सांगळे यांना पुण्यातून अटककेली. हे सर्व सध्या पोलिस कोठडीतआहेत, तर कृष्णा आंधळेचाअद्यापही शोध लागलेला नाही. आरोपींकडून शस्त्र, मुख्य आरोपींचेदोन मोबाइल व जीप जप्त केली आहे.या प्रकरणात सिद्धार्थ सोनवणे हा नवाआरोपी निष्पन्न झाला असून तोहीअटकेत आहे. आरोपींची संख्या आठ झाली आहे.

या प्रकरणात ६ आरोपी अटकेत आहेत, तर विष्णूचाटे हा खुनातील आरोपी असला तरी सध्या तोखंडणीच्या गुन्ह्यातच अटकेत आहे. अद्याप त्यालाखुनाच्या प्रकरणात अटक केलेली नाही, तर कृष्णाआंधळे हा आरोपी फरार आहे. महिनाभरातमस्साजोगला सर्वच पक्षांच्या प्रमुख नेत्यांनी भेट दिली,बीड, परभणी व पुण्यात मोठे मूक मोर्चे झाले.शवविच्छेदन अहवालानुसार देशमुखांच्या शरीरावर ५६व्रण होते तर सुमारे दीड लिटर रक्त शरीरात साकळलेहोते. यातून आरोपींची क्रूरता स्पष्ट झाली. खूनप्रकरणानंतर आवादा कंपनीला मागितलेल्या २ कोटीखंडणीचाही गुन्हा नोंदवला गेला. त्यात वाल्मीककराडला अटक झाली.

हिवाळी अधिवेशन गाजले

या प्रकरणात राजकीय नेत्यांचे आरोपअधिवेशनात गाजले. आमदार संदीपक्षीरसागर यांनी कराड हाच खुनाचामास्टरमाइंड असल्याचा आरोपसर्वप्रथम केला. त्यानंतर सुरेश धसयांनी 'आका' हा शब्द वापरला तोराज्यात गाजला. अधिवेशनात आ.क्षीरसागर, आ. आव्हाड, आ. पंडित,आ. मुंदडा, आ. धस, आ. प्रकाशसोळंकेंनी दोषींना शिक्षा व्हावी, असामुद्दा मांडला होता.

चाटेचे नाव फक्त खंडणीत

खंडणी प्रकरणाचा गुन्हा ११डिसेंबरला नोंद झाला. त्यानंतर १८डिसेंबरला अटकेतील विष्णू चाटेयाला पहिल्यांदा खुनाऐवजी खंडणीतसीबीआयने ताब्यात घेतले आहे.अद्यापही तो याच गुन्ह्यात पोलिसकोठडीत आहे. तीन वेळा त्याचीकोठडी वाढली आहे, तर फरारकराड ३१ डिसेंबरला पुणे सीआयडी कार्यालयात शरण आला. त्याला १४जानेवारीपर्यंत पोलिस कोठडीसुनावली आहे. खून प्रकरणाच्यातपासात सीआयडीला काहीमहत्वाचे पुरावे सापडले आहेत. यातप्रामुख्याने जप्त मोबाइलमध्ये संतोषदेशमुख यांना मारहाण करतानाचेव्हिडिओ आढळले आहेत.

**कराडने पुण्यात शरणागतीसाठी वापरलेली स्कॉर्पिओ जप्त**

पुण्याच्या सीआयडी कार्यालयात शरणागतीच्या वेळी आरोपी वाल्मीक कराडज्या स्कॉर्पिओतून आला, ती कार सीआयडीने जप्त करून केजला आणली.

**जप्त स्कॉर्पिओ धनंजय मुंडे समर्थकाच्या पत्नीची**

पुण्याच्या सीआयडी कार्यालय कराड शरण आलात्यावेळी ज्या स्कॉर्पिओने तो आलाहोता, ती कार सीआयडीने जप्तकरून ती केज पोलिस ठाण्यातआणली. ही कार धनंजय मुंडेसमर्थक शिवलिंग मोराळे यांच्यापत्नीच्या नावावर आहे. एम. एच. २३बी. जी. २२३१ या क्रमांकाची पांढऱ्यारंगाची स्कॉर्पिओ कार कराडनेवापरली होती. हीच कार कराडनेफरार होतानादेखील वापरल्याचादावा एसआयटीने केज न्यायालयातकेला आहे. त्यामुळे ही स्कॉर्पिओकार तपासाच्या दृष्टीने जप्त करण्यात आली आहे.

## स्वबळसेना, मनपा,जि.प निवडणुका स्वतंत्र लढण्याची उध्दवसेनेची घोषणा, शरद पवार गट, काँग्रेसला जय महाराष्ट्र

# वाघ आता एकटाच चालणार

मुंबई, (दिव्य न्युज):- मुंबई ते नागपूरपर्यंतच्या सर्व महापालिका, जिल्हा परिषदांसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका उद्धवसेना आता स्वबळावर लढवणार आहे. पक्षाचे मुख्य प्रवक्ते, खासदार संजय राऊत यांनी शनिवारी सकाळी ही अधिकृत घोषणा केली. आघाडीत कार्यकर्त्यांना संधी मिळत नाही. त्याचा फटका पक्षाला आणि पक्षाच्या वाढीला बसतो. म्हणून आम्हाला आमचे स्वबळ आजमावून पाहायचे आहे,' अशी मखलाशी त्यांनी केली. त्याला खासदार अरविंद सावंत यांनीही पाठिंबा दिला.

उद्धवसेनेच्या या भूमिकेचे काँग्रेस नेते, सुप्रिया सुळेंनी स्वागत केले. सुळेंच्याच पक्षाचे नेते जितेंद्र आव्हाड यांनी मात्र नाराजी व्यक्त केली. दरम्यान, भाजप प्रदेशाध्यक्ष बावनकुळे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी महायुती म्हणूनच लढणार असल्याचे जाहीर केले.

शिंदेसेना महायुतीतच लढणार : एकनाथ शिंदे

मुंबई मनपासह सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका आम्ही महायुतीतच लढणार असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी स्पष्ट केले. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मनसेशी मुंबईत युतीचा निर्णय मुंबईतील भाजपचे नेते, पदाधिकारी घेतील.

का घेतला निर्णय : मुंबई मनपा हातून जाण्याची धास्ती

विधानसभेत हिंदुत्ववादी मतदार उद्धवसेनेपासून दुरावले. यामुळे अनेक पदाधिकारी महायुतीकडे जात आहेत. आता उद्धवसेनेसाठी सर्वात महत्त्वाची मुंबई मनपा हातातून जाण्याची धास्ती आहे. आऊटगोइंग रोखून, हिंदुत्ववादी मते मिळवण्याचा स्वबळाशिवाय दुसरा मार्गच उद्धव ठाकरेंकडे शिल्लक नाही.

विधानसभा निवडणुकीत जबर फटक्याचा परिणाम

एकेकाळी शिवसेना सोडणाऱ्यांना दंडुक्यांचा कपडे फाटेपर्यंत जाहीर प्रसाद दिला जात असे. विधानसभेच्या निकालानंतर आऊटगोइंग वाढत चालल्याने शुक्रवारी उद्धव ठाकरे यांनी 'ज्यांना जायचे त्यांनी जा' असेही म्हटले होते. प्रत्यक्षात वेगळेच घडत आहे. माजी खासदार चंद्रकांत खैरेंनी शनिवारी छत्रपती संभाजीनगरातील एका मेळाव्यात उद्धव ठाकरेंना सोडू नका, अशी विनवणी करत पदाधिकारी, कार्यकर्त्यांना जाहीरपणे दंडवत घातला.

### सुप्रियांचे एक, आव्हाडांचे दुसरेच

**खा. सुप्रिया सुळे : महापालिकेची निवडणूक कायकर्त्यांची असते. त्यांनी काय फक्त सतरंज्या उचलाव्यात का? त्यामुळे त्यांना न्याय मिळालाच पाहिजे.**

**आ. जितेंद्र आव्हाड : उद्धवसेनेने हा निर्णय फार घाईने घेतलेला दिसतोय. मात्र, त्यांच्या स्वबळाच्या इच्छेला थांबवणारे आम्ही कोण? पण हा निर्णय योग्य नाही.**

### वडेट्टीवार, गायकवाडांकडून स्वागत

**विजय वडेट्टीवार : त्यांच्या पक्षाचे मोठे नेते असलेल्या संजय राऊत यांनी घोषणा केली आहे. तरीही उद्धव ठाकरेंना विनंती करू, अन्यथा आमचा मार्ग आम्हाला मोकळा आहे.**

**खा. वर्षा गायकवाड : आमच्याही कार्यकर्त्यांचे म्हणणे आहे की त्यांना लढायची संधी मिळाली पाहिजे. आमच्या नेत्यांशी चर्चा करून याविषयी निर्णय घेऊ.**

### ४ निवडणुका उद्धवसेनेने मविआच्या मदतीने लढल्या

उद्धवसेना काँग्रेस, शरद पवारांच्या मदतीने विधानसभा पोटनिवडणूक, २०२४ ची लोकसभा, विधानसभा, ग्रा. पं. लढली.

पुढे काय? : निकालानंतर एकत्र येऊ शकते मविआ

उद्धव ठाकरेंनी स्वबळाचा नारा जाहीरपणे दिल्याने यापुढील काळात महाविकास आघाडीची सध्या तीन शकले होणे आता अटळ झाले आहे. मात्र, मनपा, जि.प.तील स्थानिक राजकारण, संख्याबळ पाहून तेथील निकालानंतर महापौर किंवा जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी हे तिन्ही पक्ष मविआचा प्रयोग करू शकतात.

विधानसभेनंतर काय झाले? मविआविरुद्ध आवाज वाढला

आतापर्यंत मातोश्रीवरील आढावा बैठकांना एका जिल्ह्यातून किमान ३०० पदाधिकारी असायचे. डिसेंबरअखेरच्या आढावा बैठकांना काही जिल्ह्यांतील फक्त २५ जण हजर होते. काँग्रेस, शरद पवारांसोबत जाणे म्हणजे आत्मघातच, असे त्यातील बहुतांश जणांनी उद्धव यांना बजावल्याचे सूत्रांनी सांगितले.

### उध्दवसेना बदलतेय... आधी मारत होते दंडुके, आता घालू लागले आहेत जाहिरपणे दंडवत



पान १ वरून

## बेगमबाग कॉलनीतील

तर कारवाई केली जाईल.शनिवारी दुपारी ३ वाजेपर्यंत बेगमबाग कॉलनी परिसरातील १०० घरे जमीनदोस्त झाली होती. महाकाल मंदिराचे प्रभारी एडीएम आणि प्रशासक म्हणाले की, ही कारवाई पूर्ण होण्यासाठी एक ते दोन दिवस लागतील. आतापर्यंत ही कारवाई शांततेत सुरू आहे. लोक स्वतः प्रशासनाला सहकार्य करत आहेत. त्यांची घरे रिकामी करत आहेत.

खरं तर, महाकाल मंदिर परिसराच्या विस्तार आणि सुशोभीकरणाच्या मार्गात अडथळा ठरणाऱ्या बेगमबाग कॉलनीची जमीन हस्तांतरित करण्याचा मोठा अडथळा आता दूर झाला आहे. येथील रहिवाशांची याचिका मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. मात्र कनिष्ठ न्यायालयांमध्ये सुरू असलेल्या प्रलंबित खटल्यांमुळे प्रशासनाला ताबा घेता आला नाही. आता कनिष्ठ कोर्टात देखील प्रशासनाच्या बाजूने निर्णय देण्यात आला आहे. त्यामुळे कारवाई करण्याचा मार्ग मोकळा झाला.

शुक्रवारी संध्याकाळी परिसरात घोषणा करण्यात आली आणि लोकांना घरे रिकामी करण्याची अंतिम सूचना देण्यात आली. त्यानंतर शनिवारी सकाळी प्रशासकीय कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत, महानगरपालिकेने जेसीबी आणि इतर यंत्रांच्या सहाय्याने घरं पाडायला सुरुवात केली. या घरांसोबतच जिल्हा प्रशासनाच्या पथकाने येथे बेकायदेशीरपणे बांधलेले धार्मिक स्थळही पाडलं.

या प्रकरणात, बाधित लोकांनी सांगितले की त्यांना घर रिकामे करण्यासाठीही वेळ देण्यात आला नाही. मिळालेली भरपाई देखील तुटपुंजी होती. आमची मुलं दोन दिवसांपासून उपाशी आहेत, आम्ही त्यांना दुसऱ्यांच्या घरी सोडले आहे. आम्हाला रात्री ८ वाजता नोटीस देण्यात आली. त्यापूर्वी कोणत्याही प्रकारची सूचना प्रशासनकडून देण्यात आली नव्हती. आम्ही इथं २० ते २५ वर्षांपासून राहत आहोत, असंही त्यांनी सांगितलं.

## आरिफ खानने इस्लाम

होती. या सिनेमातील अजयच्या दमदार परफॉर्मन्सने सगळ्यांची मनं जिंकली. हा सिनेमाही सुपरहिट ठरला होता. तर या सिनेमात अरिफने निगेटिव्ह भूमिका साकारली. त्याची ही भूमिका गाजली पण नंतर त्याला तितकस यश मिळालं नाही. त्याने नव्वदच्या दशकात अनेक सिनेमात काम केलं पण त्याला ओळख मिळाली नाही.

आरिफ खानने अजय देवगणच्या 'फूल और कांटे' या सिनेमात त्याने रॉकीची भूमिका साकारली होती. त्याची निगेटिव्ह भूमिका खूप गाजली. त्यानंतर त्याने मोहरा, वीरगती, दिलजले या सिनेमांमध्ये काम केलं. सलमान खान, अक्षय कुमार, सुनील शेट्टी या कलाकारांबरोबर त्याने स्क्रीन शेअर केल्या. त्याने बऱ्याच निगेटिव्ह भूमिका साकारल्या.

इतकंच नाही तर त्याने हॉलिवूड सिनेमात काम केलं. अँजेलिना जोलीबरोबर त्याने या सिनेमात स्क्रीन केली होती. 'अ माईटी हार्ट' या २००७ रिलीज झालेल्या सिनेमात त्याने काम केलं होतं. पण त्यानंतर कोणतीही हॉलिवूड फिल्म त्याला मिळाली नाही. एक ही मंजिल या अखेरच्या बॉलिवूड सिनेमात त्याने काम केलं होतं.

अनेक वर्ष अभिनयक्षेत्रात काम करून त्यात अपेक्षित यश न मिळाल्याने त्याने बॉलीवूडला अलविदा केला. त्याने धार्मिक मार्गाचा अवलंब करत त्याने मौलानाची भूमिका साकारली. सध्या तो मौलाना बनून त्याच्या धर्माचा प्रचारक आणि धार्मिक गोष्टींचा पुरस्कर्ता म्हणून काम करतोय. वाढलेली दाढी आणि पांढरा कुर्ता यामधील त्याचे फोटो चर्चेत आहेत.

या आधी सना खाननेही बॉलिवूड सोडत इस्लाम धर्माचा स्वीकार केला. तिने मौलवी अनस सईद यांच्याशी तिने लग्न केलं.

## परळीत आणखी

विरोधही केला होता. अशात हा अपघात घडल्याने याबाबतही आता वेगवेगळ्या शंका उपस्थित केल्या जात आहेत.

दरम्यान, बीडमधील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणात आतापर्यंत सुदर्शन घुले, विष्णू चाटे, सुधीर सांगळे, जयराम चाटे, सुधीर घुले, प्रतिक घुले, कृष्णा आंधळे आणि सिद्धार्थ सोनवणे यांना अटक झाली आहे. कालच, या सर्व आरोपींवर मोक्का लावण्यात आला.एसआयटीने हा मोक्का लावला आहे. मात्र, मुख्य संशयित आरोपी वाल्मिक कराडवर मोक्का लावण्यात आलेला नाही. वाल्मिक कराडला सध्या खंडणीच्या गुन्ह्यात अटक झाली आहे. त्याच्यावर संतोष देशमुख हत्या प्रकरणाचा गुन्हा दाखल नाहीये, त्यामुळे कराडवर मोक्का लावण्यात आला नाही. तर आरोपी कृष्णा आंधळे हा अजूनही फरार आहे. पोलीस त्याच्या शोधात आहेत.

## बाप एक नंबरी,

याचिकेत सुशीलवर रिव्हॉल्व्हरचा धाक धाकवून लुटमार केल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाने सुशील कराडच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

सुशील कराडने त्याच्या मॅनेजरच्या घरात घुसून रिव्हॉल्वरचा धाक दाखवत दोन बल्कर ट्रक, दोन कार, परळीतील प्लॉट आणि सोने बेकायदेशीरपणे ताब्यात घेतल्याचा आरोप करण्यात आला आहे. सुशील आणि वाल्मिक कराडसह त्याचे मित्र अनिल मुंडे आणि गोपी गंजेवार यांच्याविरुद्ध ही खाजगी फिर्याद दाखल करून घेण्याची मागणी न्यायालयाकडे करण्यात आली आहे.

मॅनेजरच्या पत्नीने याबाबत सोलापुरातील एमआयडीसी पोलीस स्टेशन, सोलापूर पोलीस आयुक्त आणि पोलीस अधीक्षक बीड यांच्याकडे तक्रार दिली मात्र त्याची दखल घेतली गेली नाही. त्यामुळे, पीडित महिलेने सोलापूर जिल्हा, सत्र न्यायालयात खासगी फिर्याद दाखल केली. त्यावर आरोपींनी त्यांचं म्हणणं दाखल केले असून १३ जानेवारी रोजी याबाबत सुनावणी होणार आहे. आता सुशील कराडवर केलेल्या आरोपबाबत सोलापूर जिल्हा आणि सत्र न्यायालय काय निर्णय देते हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

संदरम्यान, बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख हत्याकांडामुळे राज्य हादरलं आहे. हा हत्याकांडातील ८ आरोपींवर सीआयडीने मकोका लावला आहे. विष्णू चाटे, सुदर्शन घुले, जयराम चाटे, सिद्धार्थ सोनवणे, प्रतीक घुले, सुधीर सांगळे, महेश केदार आणि कृष्णा आंधळे हेच ते ८ आरोपी ज्यांच्यावर संतोष देशमुखांच्या हत्येचा आरोप आहे. या पैकी सात जणांना उखऊन गजाआड केलं आहे. तर कृष्णा आंधळे अद्यापही पोलिसांच्या हाती लागला नाही. आंधळेला जेरबंद करण्याचं आव्हान सीआयडीसमोर आहे. खरंतर गेल्या काही दिवासांपासून संतोष देशमुखांच्या मारेकऱ्यांवर मोक्कांतर्गत कारवाईची मागणी केली जात होती. आता आठ जणांवर मोक्का लावल्यामुळे वाल्मिक कराडचं काय होणार याविषयी चर्चा सुरू झाली आहे. वाल्मिक कराडवर पोलिसांनी पवनचक्की खंडणी प्रकरणी गुन्हा दाखल केला आहे. पण खंडणी प्रकरणातील आरोपी विष्णू चाटे आणि सुदर्शन घुले यांचा संतोष देशमुख हत्या प्रकरणातही सहभाग आहे आणि त्यामुळेच खंडणी आणि हत्या प्रकरणाचा एकमेकांशी संबंध आहे का? याचा तपास सीआयडी तसंच एसआयटीकडून केला जात आहे.

## मंत्री धनंजय मुंडेंचे

आकालाही (वाल्मीक कराड) मोक्का लागला पाहिजे. त्याने बीडच्या महासंस्कृती महोत्सवाच्या माध्यमातून १० लाख खर्च करून ५ कोटी सरकारी तिजोरीतून काढून खिशात घातले. उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी धनंजय मुंडे यांचा दुरान्वयेही संबंध नाही, असे म्हटल्याचे सांगत मुंडे दिवसा माणसे मारत आहेत. त्यांना मंत्रिमंडळातून काढा. तुमचे वागणे बरे नाही, असे धस म्हणाले.

मानवाधिकार आयोगात गुन्हा

केज : सरपंच हत्येप्रकरणी राष्ट्रीय मानवाधिकार आयोगात गुन्हाही नोंद झाला. खासदार बजरंग सोनवणे यांनी ३ जानेवारीला आयोगात तक्रार दिली.

आई तुळजाभवानी तूच न्याय दे : वैभवी

सरपंच देशमुख यांची कन्या वैभवी म्हणाली, माझ्या वडिलांची हत्या होऊन महिना झाला. अजून न्याय मिळत नाही. आई तुळजाभवानी तूच न्याय दे. दुष्टांचा संहार कर. तर, खून व खंडणीतील आरोपी एकच आहेत. सर्वांवर मोक्का लावा, अन्यथा आम्ही हे राज्य बंद पाडू, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

वाल्मीकच्या मुलासह तिघांविरुद्ध तक्रार

सोलापूर : परळी येथे राहत असताना आपले दोन बल्कर ट्रक, दोन कार व जागा अनिल मुंडे याच्या नावावर वाल्मीक कराड यांचा मुलगा सुशील याने बळजबरीने खरेदी केल्याची तक्रार सोलापुरातील जिल्हा व सत्र न्यायालयात दाखल झाली.

८ आरोपींवर मोक्काची कारवाई करण्यात आली. पण खंडणी प्रकरणात वाल्मीक कराडला मोकळे कसे ठेवले, कराडने व्हिडीओ कॉलवर देशमुख यांची हत्या पाहिली आहे. वाल्मीक कराडला कोण वाचवत आहे?

– अंजली दमानिया,

सामाजिक कार्यकर्त्या

हे प्रकरण राजकीय भूमिका घेण्यापेक्षा संवेदनशील पद्धतीने हाताळले असते तर बरे झाले असते. आ. सुरेश धस यांनी या घटनेची ज्या पद्धतीने मांडणी केली, त्यामुळे बीड बदनाम झाले. बीडचे लोक स्वाभिमानी आहेत.

– पंकजा मुंडे, मंत्री,

पर्यावरण आणि पशुसंवर्धन

## व्हिडिओ कॉलवर

अजूनही हत्येचा उलगडा झाला नाही. पोलिसांनी आता कारवाईला वेग दिला असून एकूण ८ जणांना अटक केली आहे. या सगळ्यांची सीआयडी आणि एसआयटीकडून कसून चौकशी केली जात आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात दररोज नवनवी माहिती समोर येत आहे.

आता देशमुख हत्या प्रकरणात महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. ज्यावेळी संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांना मारहाण केली जात होती, त्यावेळी एका आरोपीनं घटनास्थळावरून एक व्हिडीओ कॉल केला होता. व्हिडीओ कॉलवर एकूण सहा लोक होते, जे संतोष देशमुख यांची हत्या लाईव्ह बघत होते, अशी माहिती तपासात समोर आली आहे. या हत्या प्रकरणातील आरोपी प्रतिक घुले यानं हा व्हिडीओ कॉल केला होता.

पण आरोपी प्रतिक घुले यानं हा व्हिडीओ कॉल कुणा व्यक्तीला केला नव्हता तर त्याने हा व्हिडीओ कॉल व्हॉट्सॲपवरील 'मोकारपंती' नावाच्या ग्रुपवर केला होता. या ग्रुपमधील सहाजण या व्हिडीओ कॉलवर लाईव्ह होते. या सहाजणांसमोर संतोष देशमुख यांना बेदम मारहाण केली जात होती, अशी धक्कादायक माहिती पोलीस तपासात समोर आली आहे. विशेष म्हणजे व्हिडीओ कॉलवर असणारे सर्व सहाजण १७ ते १९ या वयोगटातील होते. आता हे सहाजण कोण होते आणि संतोष देशमुख यांना मारहाण होताना, या ग्रुपवर व्हिडीओ कॉल करण्याचं नेमकं कारण काय होतं, याची माहिती अद्याप समोर आली नाही. पोलीस याबाबतचा तपास करत आहेत.